लोकसत्ता [ठाणे]



येऊरमधील अतिक्रमणांविरोधात शुक्रवारी नागरिकांनी मोठा मोर्चा काढला. (छायाचित्र : दीपक जोशी)

# येऊर संरक्षणासाठी नागरिकांचा मोर्चा

प्रतिनिधी ठाणे

**येऊरच्या जंगलात** बेकायदेशीररित्या अतिक्रमण करून बांधकाम करणाऱ्यांच्या विरोधात येऊर एन्व्हायरमेंटल सोसायटीच्या पुढाकाराने शुक्रवारी सकाळी पाटोणपाडा ते जिल्हाधिकारी कार्यालय मोर्चा काढण्यात आला. आदिवासींच्या हक्कांची गळचेपी करणाऱ्या प्रवृत्तींचा यावेळी निषेध करण्यात आला.

पालकमंत्री कुणाचे रक्षण करणार ? बांधकाम व्यावसायिकांचे की आदिवासींचे, बेकायदा बांधकाम तोडून टाका, येऊरच्या जंगलाचे रक्षण करा, लढा देऊ लढा देऊ हक्कांसाठी लढा देऊ, कोंडी गळचेपी आदिवासींची, बांधकाम व्यावसायिकांची दादागिरी रोखा अशा घोषणा देणाऱ्या आदिवासींचा गट येऊर आणि जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ मागण्यांच्या पूर्ततेसाठी जमला होता.

राष्ट्रीय हरित लवादातर्फे येऊरच्या जंगलात कोणत्याही प्रकारच्या बांधकामाला परवानगी दिली जाणार नाही असा आदेश देण्यात आला आहे. तसेच जिल्हाधिकारी डॉ.अश्विनी जोशी यांनी बांधकाम तोडण्याचे आदेश देऊनही अद्याप येथील (पान ११वर)

## येऊर संरक्षणासाठी नागरिकांचा मोर्चा

(पान १वरून) अतिक्रमणांवर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही. या पार्श्वभूमीवर येऊरमधील जंगलाच्या नैसर्गिक सौंदर्याचे भूमाफियांपासून रक्षण व्हावे, सर्व बेकायदेशीर बांधकामे तोडून टाकावी, येऊरमधील गट क्रमांक १४ आणि १७ येथे बेकायदेशीर कब्जा केलेल्या सुपर ड्रिम रियल इस्टेटची मोजणी किंवा सर्वेक्षण करावे. येथे राहणाऱ्या आदिवासींना संरक्षण मिळावे, अशा मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयास देण्यात आले आहे. आदिवासी आणि येऊर एन्व्हायरमेंटल सोसायटी अंतर्गत वनशक्ती, क्रायसेस, होप, सुपरवासी, वाईल्ड लाईफ वेल्फेअर असोसिएशन यासारख्या विविध दहा पर्यावरणविषयक काम करणाऱ्या संस्था या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.